**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१**
**Email id :- mscepune@gmail.com** **फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/ 5491
दिनांक :- 30 /११/२०२२

**प्रति,**

**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालक,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (जीसीसी) व शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र (जीसीसी-टीबीसी ) परीक्षा फेब्रुवारी/मार्च - २०२३ मधील प्रवेशपत्रातील दुरुस्त्यांबाबत.**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (जीसीसी ) व शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च - २०२३ मध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे.

सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी सर्व शासनमान्य संस्थाना दि.०१/१२/२०२२ पासून लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच आवेदनपत्रातील उपलब्ध माहिती नुसारच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांची प्रवेशपत्र तयार करण्यात येतील.

**त्याच प्रमाणे सदर परीक्षांसाठी प्रवेशपत्र वितरित केल्यानंतर विद्यार्थ्याचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव/पतीचे नाव,आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल,बॅच बदल इ.कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावरील फक्त स्पेलिंग दुरुस्ती असेल व विद्यार्थ्याचे नाव,वडिलांचे नाव/पतीचे नाव, आईचे नाव,आडनाव यात बदल होत नसेल तरच परीक्षेपूर्वी तीन (०३) दिवस अगोदर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयात समक्ष येऊन दंड रु.२००/- आकारुन प्रवेशपत्रावर दुरुस्ती करून घ्यावी.**

**सदर परीक्षेबाबत बॅच बदल, विषय बदल याबाबतचे या कार्यालयास ई-मेलद्वारे अथवा प्रत्यक्ष/समक्ष प्राप्त होणाऱ्या प्रस्ताव/अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

30/11/2022

**(शैलजा दराडे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहितीस्तव :**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई (उ/द/प).